International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | Website: https://ijaar.co.in/
Volume-13, Issue-6 | July – August 2026

**Original Article**

# विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसाठी वर्ग रचना:एक अभ्यास

**स्वाती तानाजी राजे[1], डॉ. प्राचार्य गोपाळ पवार[2]**

[1]संशोधक, शिक्षणशास्त्र संकुल, स्वा. रा. ती. म. विदयापीठ नांदेड.

[2]मार्गदर्शक, स्वामी विवेकानंद अध्यापक महाविद्यालय, उदगीर.

**Manuscript ID:** IJAAR-130620
**ISSN: 2347-7075**
**Impact Factor – 8.141**

**Volume - 13**
**Issue - 6**
**July – August 2026**
**Pp. 148 - 151**

**Submitted:** 06 August 2026
**Revised:** 17 August 2026
**Accepted:** 25 August 2026
**Published:** 31 August 2026

***Corresponding Author:***
*स्वाती तानाजी राजे*

Quick Response Code:

**Website:** https://ijaar.co.in/

DOI: 10.5281/zenodo.22236660

DOI Link: https://doi.org/10.5281/zenodo.22236660

Creative Commons

OPEN ACCESS

**गोषवारा:**

विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी जिल्हा परिषद शाळेमध्ये "नो मोर बँक बॅचेस" हे संकल्पना रद्द करून 'यु' आकार आणि 'अर्धगोलाकार' बैठक व्यवस्थेचा अवलंब केला जावा. 'यु' आकार बैठक व्यवस्थेमुळे "बँक बँकेस विद्यार्थी राहणार नाहीत विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढवेल प्रत्येक मुलाकडे लक्ष दिले जाते. मुलांमध्ये भेदभाव केला जाणार नाही.

***मुख्य शब्द: विद्यार्थी, गुणवत्ता, वर्ग रचना, अध्ययन-अध्यापन, शाळा, अभ्यास, शिक्षक, शैक्षणिक क्षमता.***

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
***This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International License (CC BY-NC-SA 4.0),*** *which permits others to remix, adapt, and build upon the work non-commercially, provided that appropriate credit is given and that any new creations are licensed under identical terms.*

***How to cite this article:***
*स्वाती तानाजी राजे, डॉ. प्राचार्य गोपाळ पवार. (2026). विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसाठी वर्ग रचना:एक अभ्यास. International Journal of Advance and Applied Research, 13(6), 148 – 151.* https://doi.org/10.5281/zenodo.22236660

## प्रस्तावना:

शाळा हे एक शैक्षणिक केंद्र आहे जिथे पहिली ते दहावीपर्यंत अभ्यासक्रम शिकवला जातो. शाळा हे विद्यार्थ्यांचे दुसरे घर असते ज्या ठिकाणी ज्ञानाचे आदान प्रदान होते. शाळा ही समजाला स्वत:विषयी जागृती करून आदर्श नागरिक बनवण्याचे माध्यम आहे. शाळेमधूनच विद्यार्थ्यांचा मूळ शिक्षणाचा पाया घडत असतो, खऱ्या आयुष्याची सुरुवात व्यक्तिमत्व विकासाची पहिली पायरी म्हणजे शाळा असते. शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनाच्या कार्याची मूल्यमापन केले जाते. शाळेमध्ये

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | *Website:* https://ijaar.co.in/
*Volume-13, Issue-6 | July – August 2026*

विद्यार्थ्यांना पुस्तकांचा सोबतच व्यवहारिक ज्ञान, सामाजिक मूल्य,कला, कौशल्य, नवनवीन गोष्टी शिकण्याची व विचार करण्याची बौद्धिक क्षमता वाढण्याची संधी येथे दिले जाते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास येथे होते खेळ, कला, नृत्य अनेक उपक्रमांमध्ये मुलांच्या शारीरिक आणि मानसिक क्षमतांचा विकास होतो. संस्कार आणि शिस्त सामाजिक कौशल्य इत्यादींचा विकास होतो. शाळेमधून विद्यार्थ्यांचे भविष्य आणि चांगल्या करिअरचा मार्ग मिळतो.

1. विद्यार्थ्यांच्या बैठक व्यवस्थेमध्ये बदल केल्यामुळे शिक्षकांना सर्व मुलांना समान लक्ष देता येते.
2. विद्यार्थ्यांच्या मनात शिक्षकांबद्दल वाटणारे भीती कमी होते व आपले प्रश्न मत सहजपणे मांडू शकतात.
3. शाळेमध्ये मागच्या बेंचवर बसणारी मुले “मठ” आणि समोर बसणारे “हुशार” असे समजले जाते पण U आकार व C आकार पद्धतीने वर्ग रचना केल्यामुळे कोणतेही विद्यार्थ्यांमध्ये भेदभाव केला जाणार नाही सर्व विद्यार्थ्यांना समान संधी मिळेल.

**संशोधनाची गरज आणि महत्त्व:**




**U आकार पद्धत वर्ग रचना**



**C आकार रचना वर्ग रचना**

4. विद्यार्थ्यांच्या वर्तन व गैरवर्तनाकडे शिक्षकांची प्रत्यक्ष लक्ष जाते.
5. शाळेमध्ये प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये अकार्यक्षम आणि अधिक गतिमान विद्यार्थ्यांमधील फरक लक्षात येतो.
6. अभ्यासामध्ये अकार्यक्षम असणाऱ्या मुलांना गोलाकार बसून त्यांचे प्रश्न काय आहेत हे समजून घेतले जाते. यामुळे विद्यार्थ्यामध्ये मनोरंजक वातावरण निर्माण होते.
7. वर्गांमधील असे काही विद्यार्थी असतात ज्यांचे उंची जास्त असते अशा ,मुलांना मागच्या बेंचवर बसावे लागते. या कारणाने मुलांमध्ये अभ्यास न करण्याची प्रवृत्ती वाढते.
8. अध्ययन अध्यापन करत असताना मुलांना अवयवाचे व्यंग असू शकते अशा विद्यार्थ्यांना समोरच्या बोर्डवरचं मागच्या विद्यार्थ्यांना दिसत नाही. मग जर आपण अशा मुलांसाठी सर्व मुलांना एकत्र एका वर्गामध्ये चौरस पद्धती राबवली तर,विद्यार्थ्यांच्या मानसिक समस्या सोडवू शकतो.

9. शाळेतील वर्गातील भिंती हे बोलक्या असल्या पाहिजेत यामुळे मुलांना शाळेत नियमित येण्याची सवय लागते.
10. अध्ययन अध्यापन करताना विद्यार्थ्यांच्या वर्गातील असन, व्यवस्था, अभ्यासक्रम, गुणवत्ता व वर्गाबाहेरील परिसर तेथील वातावरण आजूबाजूचा परिसर आणि शिक्षकांचे व्यक्तिमत्व यांचा प्रभाव विद्यार्थ्यांवर पडत असतो.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

1. विद्यार्थ्यांचे गुणवत्ता सुधारण्यासाठी वर्गांची योग्य रचना तयार करणे.
2. शाळेतील प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्यांचा वयोगट लक्षात ठेवून त्याची वर्गाची व्यवस्था तयार करणे.
3. मुलांच्या अध्ययन अध्यापन क्षमता सुधारण्यासाठी नवनवीन कला कौशल्यांचा आणि अध्यापन पद्धतींचा वापर करणे.
4. वर्गाची बैठक व्यवस्था सुधारण्यासाठी शाळेतील मुख्याध्यापका कडे व व्यवस्थापन समितीकडे आपले योग्य ते मत मांडणे.
5. कोण कोणत्या राज्यामध्ये शाळेतील बैठक व्यवस्था कशी आहे यांचा शोध घेणे.
6. विद्यार्थ्यांच्या बैठक व्यवस्थेमुळे कोणकोणते अध्ययन अध्यापन क्षमता विद्यार्थ्यांमध्ये विकसित होऊन विद्यार्थ्यांची मानसिक संतुलन टिकवले जाते यासाठी आपल्या शाळेतील असन व्यवस्थेमध्ये कोणत्या सुधारणा करावे याची माहिती घेणे.

**संशोधन कार्यपद्धती:**

विद्यार्थ्यांच्या अध्ययन अध्यापन क्षमता विकसित होण्यासाठी जिल्हा परिषद शाळेमध्ये बैठक व्यवस्थेमध्ये बदल करण्यात आलेला आहे.. त्यामध्ये आपल्या महाराष्ट्र राज्यातील करवीर तालुक्यातील उचगाव या ठिकाणी राबविण्यात आलेली आहे. या गावांमध्ये मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांना वर्गामध्ये मागेपुढे न बसवता गोलाकार आणि यु आकार अशी व्यवस्था केली आहे. मागच्या बेंच वर बसणाऱ्या विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही यासाठी त्यांनी "मिशन ज्ञान कवच"नावाचा उपक्रम राबविण्यात आलेला आहे.

केरळ, तामिळनाडू, पश्चिम बंगाल, पंजाब मधील शाळेमध्ये बॅकबेंचेस संस्कृती रद्द करून "यु"किंवा "अर्धवर्तुळाकार" असून व्यवस्था हा एक नवीन उपक्रम राबवला गेला आहे.

केरळ मध्ये मल्याळम चित्रपट "स्थानार्थी श्री कुटून" या चित्रपटाचे दिग्दर्शक गणेश विश्वनाथन यांनी या चित्रपटात एक पात्र शालेय विद्यार्थिनी वर्गात बँक बॅचेस असल्याने अपमान सहन केल्यानंतर पारंपारिक बसण्याची पद्धती बदल करण्याचा प्रस्ताव मांडला आणि केरळ मधील आठ शाळेमध्ये हे बैठक व्यवस्था स्वीकारलेली गेली आहे. चित्रपटाच्या माध्यमातून त्यांनी आपले अध्ययन अध्यापन क्षमता आणि शाळेमधील आसनव्यवस्थ,विद्यार्थ्यांमध्ये होत असलेली मानसिक वेदना या मध्ये दर्शवले आहे.

**संशोधन पद्धती:**

संशोधन मध्ये संशोधन पद्धतीचा अभ्यास करून मिश्र पद्धतीचा उपयोग करण्यात आलेला आहे. प्रत्येक राज्यातील जिल्हा परिषद शाळेतील बैठक व्यवस्था कशी

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | Website: https://ijaar.co.in/
Volume-13, Issue-6 | July – August 2026

आहे हे पाहण्यासाठी सर्वेक्षण पद्धत व प्रायोगिक पद्धत यांचा वापर केला आहे.

**जनसंख्या:**

या शोधनिबंधातील विषयासाठी संबंधित कोल्हापूर जिल्ह्यातील करवीर तालुक्यातील उचगाव येथे शिक्षकांची संख्या घेण्यात आली आहे.

**संशोधन साधने:**

विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसाठी वर्ग रचना- एक अभ्यास

या विषयाचा अभ्यास करण्यासाठी संशोधनाचे पदनिश्चियन श्रेणी या माहिती संकलन साधनांचा वापर करण्यात आला आहे. या पद्धतीचे श्रेणी द्वारे शिक्षकांचे आसन व्यवस्थेविषयी आणि आसन व्यवस्थेमध्ये बदल केल्यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेमध्ये काय फरक पडतो याबद्दलचे मत जाणून घेण्यासाठी पाच प्रश्नांची बिंदू नामावली तयार करण्यात आली आहे.

**संशोधनाचा निष्कर्ष:**

1. विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होतो.
2. विद्यार्थ्यांना शाळेची आवड निर्माण होते त्यामुळे मुलांच्या उपस्थितीचे प्रमाण वाढते.
3. वर्गातील समस्येवर एकत्रितपणे चर्चा करून उपाय शोधता येतात.
4. शिक्षक व विद्यार्थी यांच्यातील संबंध अधिक दृढ होतात.
5. शिक्षकांच्या अध्यापनाकडे विद्यार्थ्यांचे शिकण्याकडे अवधान केंद्रित होते.

**संदर्भ सूची:**

1. **Glass, G. V., & Smith, M. L. (1979).** *Meta-analysis of research on class size and achievement.* Educational Evaluation and Policy Analysis, 1(1), 2–16. — वर्गाचा आकार आणि विद्यार्थ्यांची शैक्षणिक कामगिरी यांच्यातील संबंधाचा महत्त्वपूर्ण meta-analysis.
2. **McGiverin, J., Gilman, D., & Tillitski, C. (1989).** *A meta-analysis of the relation between class size and achievement.* The Elementary School Journal, 90(1). — लहान वर्गातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक कामगिरी मोठ्या वर्गांच्या तुलनेत चांगली असल्याचे निष्कर्ष.
3. **Hattie, J. (2005/2006).** *The paradox of reducing class size and improving learning outcomes.* International Journal of Educational Research, 43(6), 387–425. — वर्गाचा आकार कमी केल्यानेच गुणवत्तेत सुधारणा होत नाही; शिक्षकांची अध्यापन पद्धती आणि वर्गातील संधींचा योग्य वापर महत्त्वाचा असल्याचे स्पष्ट करते.
4. **Shin, I.-S., & Chung, J. Y. (2009).** *Class size and student achievement in the United States: A meta-analysis.* KEDI Journal of Educational Policy, 6(2), 3–19. — 17 अभ्यासांच्या meta-analysis मध्ये लहान वर्गांचा विद्यार्थ्यांच्या achievement वर सकारात्मक परिणाम आढळतो.